**-: प्रेस नोट :-** दिनांक २५/०४/२०१७

आज दिनांक २५/०४/२०१७ रोजी पुणे पोलीस आयुक्तलयात ज्येष्ठ नागरीक कक्षाचे उदघाटन, ज्येष्ठ नागरीक श्री.मुकुंद वैद्य यांचे हस्ते व पोलीस आयुक्त श्रीमती. रश्मी शुक्ला व अथश्री फाऊंडेशनचे संचालक श्री.शशांक परांजपे याचे उपस्थितीत पार पडला.

पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला यांनी ज्येष्ठ नागरीकांसाठी करीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली तसेच ज्येष्ठ नागरीकांचे समस्याबाबत पुणे पोलीस अत्यंत जागरुक असून ज्येष्ठ नागरीक कक्षामार्फत त्यांचे प्रश्न सोडविणे संदर्भात प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगितले अथश्री फाऊंडेशनचे श्री.शशांक परांजपे यांनी ज्येष्ठ नागरीकांचे खरे मित्र पुणे पोलीस हेच आहेत असे सांगून पुणे पोलीसांच्या ज्येष्ठ नागरीक संदर्भातील कार्याची प्रशंसा केली.

या निमीत्ताने पुणे पोलीस आयुक्तालयात ज्येष्ठ नागरीक कक्षासाठी उभारण्यात आलेल्या नवीन इमारतीसाठी अथश्री फाऊंडेशनचे संचालक श्री.शशांक परांजपे यांचे सहकार्य झालेबददल ज्येष्ठ नागरीक यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

आतापर्यत १०,००० पेक्षा जास्त नागरीकांची नोंदणी झालेली आहे यापैकी सुमारे ५००० ज्येष्ठ नागरीकांना ओळखपत्र देण्यात आलेले असून उर्वरीत नोंदणी झालेल्या ज्येष्ठ नागरीकांना ओळखपत्र देण्याची प्रक्रिया सुरु आहे. ज्या ज्येष्ठ नागरीक यांना ज्येष्ठ नागरीक म्हणून नोंदणी करावयाची आहे त्यांनी संबधीत पोलीस ठाणेशी संपर्क साधून नोंदणी करण्याचे आवाहन पोलीसांकडून करण्यात आले आहे तसेच देण्यात आलेल्या ओळखपत्रात नावाचे स्पेलिंगमध्ये काही चुका असल्यास ज्येष्ठ नागरीक कक्षास संपर्क साधण्याचे अवाहन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.पी.आर.पाटील व आभार प्रदर्शन सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे - २ श्री. अरुण वालतुरे, पुणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरीक व पोलीस अधिकारी उपस्थितीत होते.